महाराष्ट्र शासन

# उच्च शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे-४११००१

## -: जाहिरात :-

## " केंद्र शासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठीची मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना" सन २०११-२०१२

**मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द व पारशी** या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्याना मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिक्षणासाठी केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये सन २००७-०८ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा व त्यासाठी आवश्यक असलेला अर्ज सोईस्करपणे उपलब्ध व्हावा व तो विद्यार्थ्यांना केव्हाही सहजपणे भरता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे **नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (Renewal)** करण्यासाठी **ऑनलाईन पध्दतीने** अर्ज मागविण्यात येत आहेत.

**शिष्यवृत्तीसाठी पात्र अभ्यासक्रम :**

११ वी ते पीएच.डी/व्यावसायिक/डी.एड्/बी.एड्/एम.एड् इत्यादी तसेच सर्व आय.टी.आय (एन.सी.व्ही.टी.) /सर्व डिप्लोमा व अकरावी/ बारावी स्तरावरील एम.सी.व्ही.सी.अभ्यासक्रम (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून इतर सर्व)

**किमान पात्रता व अटी :-**

१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२. मागील वार्षिक परीक्षेत किमान ५० टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
४. नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा.
५. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.२.०० लाख इतकी आहे.
६. एका कुंटुबातील फक्त दोन अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.
७. या योजनेसाठी ३० टक्के संच मुलीसाठी राखीव आहेत.
८. एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या आधारे किंवा अटीचे उल्लंघन करुन शिष्यवृत्ती मिळवली असेल तर त्यांची शिष्यवृत्ती रद्द केली जाईल/वसूल केली जाईल.
९. विद्यार्थ्यांने नजीकच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत किंवा इतर कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेमध्ये स्वतःचे खाते उघडणे आवश्यक आहे,**स्टेट बँक ऑफ इंडियाने विद्यार्थ्यांना शुन्य रकमेवर बँक खाते उघडण्यासाठी खास सवलत दिलेली आहे.**
१०. **आवश्यक ती कागदपत्रे सोबत जोडली नसल्यास तसेच विद्यार्थ्यांने आपले अर्ज प्राचार्याच्या मार्फत न पाठविल्यास तो अर्ज अपात्र ठरवला जाईल.**

**अर्जासोबत खालील आवश्यक कागदपत्रे जोडावीत :-**

१. अर्जावर विद्यार्थ्यांचे पासपोर्ट साईज्चे छायाचित्र ( फोटो)
२. माध्यमिक शालांन्त परीक्षा (दहावी) पासून उत्तीर्ण सर्व परीक्षांची गुणपत्रिकांची साक्षांकित प्रत.
३. कायम निवासाच्या पत्यासंबंधी पुरावा म्हणून शिधापत्रिकेची प्रत,वीज/दूरध्वनी देयकाची प्रत,पारपत्राची प्रत,निवडणूक ओळखपत्राची प्रत यापैंकी कोणताही एक पुरावा सादर करावा.
४. विद्यार्थ्यांने अल्पसंख्यांक दर्जाबाबतचे तसेच पालकांचे सन २०१०-११ चे वार्षिक उत्पन्न स्वयंघोषित घोषणापत्र रेव्हून्यू स्टॅम्प लावून अर्जासोबतच्या छापील नमुन्यात देणे आवश्यक आहे.
५. बँक पासबुकच्या पहिल्या पानाची ज्यावर खातेदाराचे नांव,पत्ता,खाते क्रमांक नोंद आहे त्याची छायांकित प्रत.

**अर्ज करण्याची पध्दत :-**

१. सन २०११-१२ पासून शिष्यवृत्तीचे ऑनलाइन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.
२. पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती या योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार पात्र व इच्छूक विद्यार्थ्यांनी **www.dhepune.gov.in/scholarship** या संकेत स्थळावरुन ऑनलाइन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.
३. ऑनलाइन अर्ज सादर करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने वरील संकेतस्थळावरुन स्वतःची आवश्यक ती माहिती भरुन स्वतःचा युजर आय.डी व पासवर्ड तयार करुन घ्यावा.सदरचा युजर आय.डी.व पासवर्ड विद्यार्थ्यांस त्याचा अर्ज करण्यासाठी, अर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी व अर्जाची सद्यस्थिती जाणून

घेण्याच्या कामी उपयोगी येणार आहे. त्यासाठी सदर युजर आय.डी.व पासवर्ड विद्यार्थ्यांने कायम स्वरुपी जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.

४. विद्यार्थ्यांने त्याचा युजर आय.डी.व पासवर्ड वापरुन वरील संकेतस्थळावरुन त्याचा ऑनलाइन अर्ज सादर करावा. तथापी ऑनलाइन अर्ज सादर करण्यापूर्वी योजनेची मार्गदर्शक तत्वे वाचून व समजून घ्यावे. त्याचप्रमाणे ऑनलाइन अर्जाची एक नमुना प्रिंट घेऊन त्यात आपली माहिती भरुन घेऊन ती अचूक असल्याची खात्री झाल्यानंतरच त्याचा ऑनलाइन अर्ज करावा, जेणेकरुन वेळेची बचत होऊन,अचूक ऑनलाइन अर्ज भरला जाईल.

५. अर्ज भरुन होताच विद्यार्थ्यांनी त्याची प्रिंट घ्यावी व त्याला आवश्यक ती कागदपत्रे जोडून आपल्या महाविद्यालय/संस्थेमध्ये पुढील कार्यवाहीसाठी सादर करावे.

६. ऑनलाइन अर्ज करतांना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेशी संपर्क साधून सदर अर्ज महाविद्यालयाच्या/संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घ्यावा. प्राचार्यांनी तो अर्ज ऑनलाइन सिस्टीममध्ये आणावा. सदर शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आपला अर्ज ऑनलाइन सिस्टीममध्ये येणे अनिवार्य आहे.

**महाविद्यालयीन स्तरावर अर्जाची छाननी व अर्ज पाठविण्याची पध्दत :-**

संबंधित महाविद्यालयाने/संस्थेने उच्च शिक्षण संचालनालयाने दिलेला युजर आय.डी व पासवर्ड वापरुन विहित केलेल्या वेळेत लॉगऑन करावे व विद्यार्थ्यांने ऑनलाइन अर्जाद्वारे दिलेली माहिती त्याने दिलेल्या कागद पत्राच्या आधारे तपासून पहावी.अर्ज संगणकावर दिलेल्या सुविधाद्वारे निश्चित करावा. विद्यार्थ्यांचा मुळ अर्ज स्वाक्षरीत करुन सहपत्रासह संबंधित विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालय( मुंबई,पुणे,कोल्हापूर,औरंगाबाद, नांदेड,जळगांव,अमरावती, नागपूर, पनवेल , सोलापूर ) यांचेकडे पाठवून द्यावी.

**वेळापत्रक :-**

| क्र. | कार्यसूची | दिनांक |
|---|---|---|
| १. | ऑनलाइन ॲप्लिकेशन सिस्टीम पध्दतीने विद्यार्थ्यांनी अर्ज करणे. | ११/८/२०११ ते २६/८/२०११ |
| २. | अर्ज तपासणी करुन महाविद्यालयाने/संस्थेने ऑनलाइन सिस्टीमवर अर्जास ऑनलाइन मंजूरी देणे. | ११/८/२०११ ते २९/८/२०११ |
| ३. | ऑनलाइन मंजूरी दिल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांच्या अर्जाची प्राचार्यानी स्वाक्षरी केलेली मुळ प्रत संबंधित विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालयाकडे पाठविण्याचा कालावधी. | २९/८/२०११ ते ०३/९/२०११ |
| ४. | संबंधित विभागीय सहसंचालक कार्यालयामार्फत अर्जाची छाननी करुन अर्जास ऑनलाइन मंजूरी देणे. | २९/८/२०११ ते ५/९/२०११ |
| ५. | तात्पुरती् गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रकाशित करण्याचा दिनांक | ८/९/२०११ सायं.५ वाजेपर्यंत |
| ६. | तात्पुरत्या गुणवत्ता यादी संदर्भात (तक्रारी असल्यास) विद्यार्थ्यांनी आपल्या तक्रारी ०२०-२६१११९५३ या फॅक्स क्रमांकावर सादर करणे. | ९/९/२०११ सायं.५ वाजेपर्यंत |
| ७. | अंतिम गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रकाशित करणे | ११/९/२०११ |

ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर होईल अश्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम त्यांनी स्वत:चे खाते उघडलेल्या राष्ट्रीयकृत बॅकेच्या खात्यावर जमा करण्यात येईल.

**नुतनीकरण :-**

शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणासाठी देखील महाविद्यालय/संस्थेकडे ऑनलाइन पध्दतीने वरील वेळापत्रकानुसार प्राचार्यामार्फत अर्ज करणे आवश्यक आहे. नुतनीकरणासाठी फक्त मागील वर्षाची गुणपत्रिका आणि जोडपत्र-१ नुसार वार्षिक उत्पन्नाचा दाखला अर्जासोबत जोडण्यात यावा.

अधिक माहितीसाठी **www.dhepune.gov.in/scholarship** हे संकेतस्थळ अवलोकन करावे किंवा विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक किंवा उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-१ यांचेकडे दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२६९३९ वर संपर्क साधावा.

**(डॉ.प्र.रा.गायकवाड)**
**नोडल ऑफिसर तथा प्र.शिक्षण संचालक,**
**उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**